Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक १० । पाने २।
DIGITAL EDITION



क्विंटन डी कॉकचे शतक व्यर्थ
(पान २ वर)

## मोदी सरकार प्रथमच बिल पास करण्यात अपयशी

# महिला आरक्षण विधेयक 54 मतांनी पडले!

## महिला आरक्षण विधेयक मंजूर होण्यासाठी 352 मते पाहिजे होती, 298 मिळाली

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली :** महिला आरक्षण विधेयकाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर करून घेण्यात सरकारला अपयश आले. '१३१ वे घटनादुरुस्ती विधेयक, २०२६' मध्ये एकूण जागांची संख्या वाढवून ८५० करण्याच्या तरतुदींचा समावेश होता. २१ तास चाललेल्या प्रदीर्घ चर्चेनंतर या विधेयकावर मतदान झाले. विधेयकाच्या बाजूने २९८, तर विरोधात २३० मते पडली. लोकसभेत एकूण ५२८ संसद सदस्यांनी (खासदारांनी) आपला मतदानाचा हक्क बजावला. विधेयक मंजूर होण्यासाठी दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता होती. ५२८ च्या दोन-तृतीयांश म्हणजे ३५२ मते होय. परिणामी, ५४ मतांच्या फरकाने हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. दोन विधेयके मांडलीही गेली नाहीत पहिले: सीमांकन (Delimitation) घटनादुरुस्ती विधेयक, २०२६दुसरे: केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२६ या विधेयकांवर स्वतंत्र मतदान घेण्यास सरकारने नकार दिला. ही विधेयके मुख्य विधेयकाशीच संलग्न असल्याने, त्यांच्यावर स्वतंत्र मतदानाची आवश्यकता नसल्याचे कारण सरकारने दिले. आपल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात, मोदी सरकारला सभागृहात एखादे विधेयक मंजूर करून घेण्यात अपयश येण्याची ही पहिलीच वेळ आहे. मतदानापूर्वी अमित शाह यांनी एक तासाचे भाषण दिले. या विधेयकांना मंजुरी मिळाली नाही, तर त्यासाठी विरोधी पक्षच जबाबदार असेल, असा दावा त्यांनी केला. देशातील महिला हे पाहत आहेत की, त्यांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळा निर्माण करण्याचे काम कोण करत आहे, अशी टिप्पणीही त्यांनी केली. विधेयकाच्या पराभवानंतर विरोधी पक्षाची घोषणा: "आम्ही जिंकलो!"



राहुल गांधी म्हणाले: "संविधानावर होणारा हल्ला आम्ही परतवून लावला आहे. आम्ही हे स्पष्टपणे सांगितले होते की, हे विधेयक म्हणजे महिला आरक्षणाचे खरे विधेयक नसून, भारताची राजकीय रचना बदलण्याचा एक कुटिल डाव आहे." प्रियांका गांधी म्हणाल्या: "हा आपल्या लोकशाहीचा आणि आपल्या देशाच्या एकतेचा एक मोठा विजय आहे. मी सभागृहात म्हटल्याप्रमाणे, हा संविधानावर केलेला हल्लाच होता; आणि आम्ही तो यशस्वीपणे रोखला आहे—जी एक अत्यंत सकारात्मक बाब आहे." शशी थरूर यांनी असे निरीक्षण नोंदवले की, "आम्ही सातत्याने हीच भूमिका मांडली आहे की, आम्ही महिला आरक्षणाचे पूर्णपणे समर्थन करतो आणि आजही त्याच्या बाजूने मतदान करण्यास आम्ही तत्पर आहोत. तथापि, या आरक्षणाला सीमांकन प्रक्रियेशी अविभाज्यपणे जोडले जाऊ नये." एम.के. स्टालिन म्हणाले, "२३ एप्रिल रोजी आम्ही दिल्लीचा अहंकार—आणि त्या अहंकाराला साथ देणारे गुलाम—यांचा पराभव करू." विधेयक फेटाळले गेल्यानंतर, NDA मधील महिला खासदारांनी संसद परिसरात निदर्शने केली. महिला खासदारांनी "महिलांचा अपमान—भारत हे सहन करणार नाही," अशा घोषणा दिल्या. विधेयक मंजूर होणार नाही हे सरकारला ठाऊक होते; मोदींनी तीन, तर शहांनी एक आवाहन केले विधेयक मंजूर करून घेण्यासाठी लोकसभेत आपल्याकडे आवश्यक संख्याबळ नाही, याची सरकारला पूर्ण जाणीव होती; परिणामी, त्यांनी सर्व संसद सदस्यांना आपल्या समर्थनासाठी वारंवार आवाहन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू—यांच्यासह भाजप आणि एनडीएच्या इतर अनेक खासदार व नेत्यांनी—विरोधी पक्षांना या विधेयकाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

### महिला माफ करणार नाहीत-अमित शहा

१७ एप्रिल रोजी लोकसभेत बोलताना अमित शहा यांनी स्पष्ट केले की, या देशातील महिला हे बारकाईने पाहत आहेत की, त्यांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळा निर्माण करणारे कोण आहेत. "येथे गोंधळ घालून कदाचित तुम्ही सहीसलामत निसटाल; परंतु आमच्या माता-भगिनींचा संताप तुम्हाला बाहेर नक्कीच अनुभवावा लागेल. जेव्हा तुम्ही निवडणुकीच्या काळात मते मागण्यासाठी जाल, तेव्हा स्त्रीशक्तीची सामूहिक ताकद तुमच्याकडे हिशोब मागेल."

Selected

### इस्रायल-लेबनॉन यांच्यात दहा दिवसांचा शस्त्रसंधी

अमरावती : इस्रायल आणि लेबनॉन यांच्यात १० दिवसांचा शस्त्रसंधी झाल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी केली. अनेक दशकांनंतर वॉशिंग्टनमध्ये दोन्ही देशांमध्ये पहिल्यांदाच थेट चर्चा झाली होती. अमेरिका व इराण यांच्यात इस्लामाबादमध्ये होणाऱ्या प्रस्तावित शांतता चर्चेसाठी हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. लेबनॉनमध्ये इस्रायल आणि इराण समर्थित हेझबोला या दहशतवादी गटात महिनाभरापेक्षा जास्त काळ संघर्ष सुरू आहे. इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेत्यानाहू आणि लेबनॉनचे अध्यक्ष जोफे औन यांच्याशी उत्तम चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे ट्रम्प यांनी समाजमाध्यमावर स्पष्ट केले. उच्चस्तरीय बैठकीसाठी ट्रम्प यांनी या दोन्ही देशाच्या प्रमुखांना व्हाईट हाऊसमध्ये आमंत्रित केले आहे. दरम्यान, पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर यांनी तेहरानमध्ये इराणी पार्लमेंटचे सभापती मोहम्मद बघेर घालीबाफ यांच्याशी चर्चा केली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## दुपारी बाहेर पडू नका; उन्हाशी खेळ जीवावर बेतू शकतो

### गुलाबराव पाटील यांचे नागरिकांना आवाहन

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव :** जिल्ह्यात वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका गंभीर बनत चालला असून नागरिकांनी स्वतःची व कुटुंबाची विशेष काळजी घ्यावी, उन्हाशी खेळ करू नका; सावधगिरीच हा सर्वोत्तम उपाय आहे. स्वतःची काळजी घ्या, कुटुंबाची काळजी घ्या... उन्हाळा काही दिवसांचा असतो, पण आपला जीव अमूल्य आहे," असे भावनिक शब्दांत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी नागरिकांना थेट सतर्क राहण्याचे आवाहन केले.सध्या उन्हाचा पारा धोकादायक पातळीवर पोहोचत असून दुपारी १२ ते ४ या वेळेत सूर्यप्रकाश अत्यंत तीव्र असतो. या काळात शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असे सांगण्यात आले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांनी दुपारच्या वेळेत शेतातील कामे टाळावीत, जनावरांसाठी सावली व पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे, तसेच ग्रामपंचायतींनी दवंडी करून नागरिकांमध्ये जनजागृती करावी, असे आवाहनही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. अत्यावश्यक काम असल्यासच बाहेर पडावे व बाहेर जाताना डोक्यावर टोपी किंवा कापड वापरणे, हलके व सैल कपडे परिधान करणे तसेच पाण्याची बाटली सोबत ठेवणे आवश्यक



असल्याचे सांगण्यात आले. शहरी भागातील नागरिकांनी अनावश्यक बाहेर पडणे टाळून कामांचे नियोजन सकाळ किंवा सायंकाळच्या वेळेत करावे. बांधकाम साईट, दुकाने व कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अनिवार्य ठेवावी, तसेच रस्त्यावर काम करणाऱ्या मजुरांनी नियमित विश्रांती घ्यावी, असे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत.

#### आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा

उष्माघाताची लक्षणे जसे की डोकेदुखी, चक्कर येणे, अशक्तपणा, मळमळ किंवा जास्त घाम येणे याकडे दुर्लक्ष करू नये. अशी लक्षणे जाणवल्यास त्वरित सावलीत विश्रांती घ्यावी व आवश्यक असल्यास जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान,सूचनेनुसार जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उष्माघात कक्ष सज्ज ठेवण्यात आले.

## शिरसोलीत आंबेडकर जयंती बॅनर फाडल्याने तणाव; संतप्त भीमसैनिकांचा निषेध

### पोलिसांच्या उशिरा येण्यामुळे रोष; सीसीटीव्ही तपासून कारवाईचे आश्वासन

जन सम्राट टाईम्स

जळगाव : जळगाव जिल्ह्यातील शिरसोली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त लावण्यात आलेले शुभेच्छा बॅनर समाजकंटकाने फाडल्याची घटना घडल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या प्रकारामुळे संतप्त बौद्ध समाज बांधव व भीमसैनिक मोठ्या संख्येने रात्री एकत्र येत निषेध व्यक्त करत संबंधित आरोपीला तात्काळ अटक करण्याची



मागणी करू लागले. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी जळगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याशी वारंवार संपर्क साधला. मात्र, रात्री उशिरापर्यंत पोलीस घटनास्थळी न पोहोचल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. त्यामुळे भीमसैनिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून पोलीस प्रशासनाविरोधात रोष व्यक्त करण्यात आला. दरम्यान, परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच अखेर रात्री उशिरा पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासून संबंधित आरोपीचा शोध घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. पोलिसांच्या आश्वासनानंतर उपस्थित नागरिक शांत झाले आणि जमाव पांगला. मात्र, या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## साखर उत्पादनाबाबतचा अंदाज चुकला?

जन सम्राट टाईम्स

मुंबई : राज्यातील यंदाचा साखर हंगाम आटोपला आहे. एक नोव्हेंबरपासून सुरू झालेले गाळप साधारण १५ एप्रिलपर्यंत चालले. हंगामात सरासरी ९० ते १०० दिवस गाळप चालले. हंगामअखेर १०४५.५८ लाख टन उसाचे गाळप होऊन, सरासरी ९.४९ टक्के ९९.१८ लाख टन साखर उत्पादन झाले आहे. गाळप हंगामात १०३ सहकारी आणि १०७ खासगी, असे एकूण २१० कारखान्यांनी गाळप सुरू केले होते. दैनिक १०,०७,८०० टन क्षमतेने कारखान्यांनी एकूण १०४५.५८ लाख टन उसाचे गाळप झाले आहे. राज्याचा सरासरी साखर उतारा ९.४९ टक्के राहिला. १६ एप्रिलअखेर एकूण ९९.१८ लाख टन साखर उत्पादन झाले आहे. त्या खालोखाल पुणे विभागाने २२.२२ लाख टन, सोलापूर विभागाने १९.१० लाख टन, अहिल्यानगर विभागाने ११.१३ लाख टन, छत्रपती संभाजीनगरमध्ये १० लाख टन, नांदेड विभागात ११.९० लाख टन, अमरावती विभागात ११.४४ लाख टन, नागपूर विभागात ०.८१ लाख टन, असे एकूण ९९.१८ लाख टन साखर उत्पादन झाले आहे.

## उन्हाळ्यात पाणी व वीजपुरवठा अखंडितपणे सुरु ठेवावा

### पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश ; जिल्ह्यात आजपर्यंत एकही "टँकर" सुरु नाही

जन सम्राट टाईम्स

जळगाव : पाणीपुरवठा व वीज ही मुलभूत व अत्यावश्यक सेवा असून, उन्हाळ्याच्या काळात कोणत्याही परिस्थितीत पाणी व वीजपुरवठा खंडित होऊ नये. यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून नागरिकांना अखंडितपणे सेवा द्यावी," असे निर्देश राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन सभागृहात जिल्ह्यातील पाणीटंचाई व महावितरण कडील विविध विषयांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार चंद्रकांत सोनवणे, आमदार अनिल पाटील, आमदार अमोल जावळे, जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण, उपमहापौर मनोज चौधरी तसेच जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदांचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी शहरात व ग्रामीण भागात



पाणीपुरवठा योजनांच्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित होऊ नये, यासाठी महावितरणने विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले. अत्यावश्यक परिस्थितीत पाणी व वीज खंडित करावी लागल्यास जिल्हाधिकारी यांना पूर्वसूचना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असलेल्या भागांमध्ये वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जलजीवन मिशनअंतर्गत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे अधिकारींनी त्याठिकाणी जाऊन त्याचे तात्काळ निराकरण करावे, महावितरणकडील वीज जोडणीअभावी काही पाणीपुरवठा योजना रखडल्या असल्याचे निदर्शनास आणून देत त्या तातडीने सुरू करण्याचे निर्देश देऊन अनधिकृत पाणी उपसा होत असल्यास अशा ठिकाणी पाणी मोटर कनेक्शन तात्काळ बंद करावे असे निर्देशित पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. नगरपालिका व नगरपंचायत स्तरावरील विकासकामांमध्ये दर्जा राखण्यावर भर देत अत्यल्प दरात कामे घेतल्यामुळे गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे नमूद करून संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याचे आवाहन करण्यात केले. जिल्ह्यात पाणीपुरवठा योजनांची अपुर्ण कामे तात्काळ पुर्ण करण्याच्या सूचना ही पालकमंत्र्यांनी दिल्या. वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे म्हणाले, भुसावळ औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना वीज पुरवठा संदर्भात अडचणी आहेत विजेच्या अडचणीमुळे त्यांच्या उत्पादनावर परिणाम होत असून या संदर्भात महावितरण ने या भागातील विजेचा प्रश्न तात्काळ सोडवावा अशा सूचना त्यांनी दिल्यात. भुसावळ तालुक्यातील अमृत योजना टप्पा एक व दोन ची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावीत, भुसावळ शहरातील पाणीटंचाई लक्षात घेता पाणीपुरवठाच्या योजनांची अपूर्ण कामे पूर्ण करावीत अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## धरणगावात क्रिकेट सामन्यात थरार; पिचवर ट्रॅक्टर घुसवून नांगर फिरवला

### आमदार चषक स्पर्धेत राजकीय वादाची पार्श्वभूमी; गोंधळानंतर सामना रद्द

जन सम्राट टाईम्स

**जळगाव (धरणगाव प्रतिनिधी) :** धरणगावात सुरू असलेल्या आमदार चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अभूतपूर्व प्रकार घडला असून, एका ट्रॅक्टरने थेट मैदानात घुसून पिचवर नांगर फिरवल्याने सामना रद्द करण्याची वेळ आयोजकांवर आली. या घटनेमुळे काही काळ मैदानावर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

गेल्या आठवड्यात घडलेल्या या घटनेचा व्हिडिओ समोर आल्यानंतर संपूर्ण तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. स्थानिक राजकारणातील मतभेद आणि



शिवसेनेच्या ठाकरे व शिंदे गटातील संघर्ष यामागे असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

माहितीनुसार, शिंदे गटाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या क्रिकेट स्पर्धेच्या डे-नाईट अंतिम सामन्यादरम्यान अचानक एक ट्रॅक्टर मैदानात आला आणि थेट खेळपट्टीवर नांगर फिरवून बाहेर पडला. या प्रकारामुळे खेळाडू, आयोजक आणि प्रेक्षकांमध्ये एकच गोंधळ उडाला. काही काळ परिस्थिती तणावपूर्ण बनली होती.

धरणगाव नगरपालिका निवडणुकीपासून ठाकरे आणि शिंदे गटामध्ये राजकीय संघर्ष सुरू असल्याचे सांगितले जात आहे. सध्या नगराध्यक्षा म्हणून ठाकरे गटाच्या लिलाताई चौधरी कार्यरत आहेत. स्पर्धेच्या उद्घाटनावेळी त्या उपस्थित होत्या, तर समारोपासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे सुपुत्र व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील तसेच भाजपचे काही पदाधिकारी उपस्थित होते.

या सर्व गोंधळानंतर आयोजकांनी अंतिम सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, या घटनेमुळे क्रीडा स्पर्धेत राजकारण शिरल्याची टीका होत असून, धरणगावातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापल्याचे दिसून येत आहे.

#### घटनेनंतर राजकीय आरोप-प्रत्यारोप

शिंदे गटाकडून प्रतापराव पाटील यांनी आरोप केला की, "नगराध्यक्षांच्या पुत्र राकेश चौधरी यांच्या सांगण्यावरूनच हा प्रकार घडवण्यात आला. राजकारण करायचे असेल तर समोरासमोर करावे, पाठीमागून असे प्रकार करू नयेत." तर दुसरीकडे नगराध्यक्षा लिलाताई चौधरी यांचे पुत्र निलेश चौधरी यांनी सर्व आरोप फेटाळून लावत म्हटले की, "या घटनेशी आमचा कोणताही संबंध नाही. ही केवळ बदनामी करण्याचा प्रयत्न आहे. उद्घाटनावेळी नगराध्यक्षा उपस्थित होत्या, मात्र समारोप रात्री उशिरा असल्याने त्या तेथे नव्हत्या."

## टीसीएसचे नाशिक केंद्र सुरू राहणार का?

जन सम्राट टाईम्स

मुंबई : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या (टीसीएस) नाशिक केंद्रातील अंतर्गत व्यवस्थेचे प्राथमिक परीक्षण करण्यात आले. सध्या आरोप करण्यात येत असलेल्या प्रकारची एकही तक्रार पॉश अथवा नीतीमूल्य समितीकडे करण्यात आलेली नसल्याचे केंद्रातील नोंदीतून दिसून येत आहे, असे स्पष्टीकरण कंपनीचे मुख्याधिकारी व व्यवस्थापकीय संचालक के. किर्तीवासन यांनी शुक्रवारी दिले. टीसीएसने किर्तीवासन यांचे निवेदन जाहीर केले असून, त्यात म्हटले आहे की, कंपनीचे नाशिकमधील केंद्र सुरू असून, ते ग्राहकांना सेवा देत राहणार आहे. ते बंद करण्यात आल्याच्या बातम्या खोट्या आहेत. नाशिक केंद्रातील व्यवस्थेचे प्राथमिक परीक्षण करण्यात आले आहेत. तसेच, नोदींही तपासण्यात आल्या आहेत. सध्या आरोप करण्यात येत असलेल्या प्रकारच्या एकही तक्रार नीतीमूल्य अथवा कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (पॉश) तक्रार निवारण समितीकडे करण्यात आलेली नव्हती. सध्या प्रसारमाध्यमांमध्ये निदा खान यांचा उल्लेख मनुष्यबळ व्यवस्थापक म्हणून करण्यात येत असून, तो चुकीचा आहे. त्यांचा मनुष्यबळ प्रक्रियेशी कोणताही संबंध नाही. त्या प्रक्रिया सहयोगी म्हणून काम करीत होत्या आणि त्यांच्याकडे कोणतीही नेतृत्वाची जबाबदारी नव्हती. कर्मचारी कल्याण आणि त्यांचे संस्थेतील वर्तन यांना टीसीएस सर्वोच्च प्राधान्य देते.

» Selected

## भारतीय संविधान मानवी मूल्यांचं सुरक्षा कवच - हृदयमानव अशोक

मुंबई : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त द पुन्हा स्कूल अँड होम फॉर ब्लाइंड बॉईज या कोरेगाव येथील अंध शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह व संविधान जागर व्याख्यान मालेत कवी, लेखक, दिग्दर्शक हृदयमानव अशोक यांचं "आम्ही भारताचे लोक" हे दैनंदिन जगण्यात संविधान सांगणारं सत्र पार पडलं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दृष्टी समता प्रस्थापित करण्याकडे अधिक होती. त्यांनी सांगितलेल्या विचारांवर चालणं हेच बाबासाहेबांना खरं अभिवादन आहे. वास्तविक भारतीय संविधान हे मानवी मूल्यांचं सुरक्षा कवच आहे अशा भावना हृदयमानव अशोक यांनी व्यक्त केल्या. शालेय पाठ्यपुस्तकात पहिल्या पानावर असलेल्या संविधान प्रस्ताविकेतील मूल्ये दैनंदिन जगण्यात कशी आत्मसात करावी, समाजभान कसं डोळस ठेवावं, आम्ही भारताचे लोक म्हणजे नक्की काय ?,यावेळी प्रशासकीय शासकीय अधिकारी अमृत लोखंडे, मुख्याध्यापक दामोदर सरगम, ज्ञानेश पाटील, वरिष्ठ शिक्षक रंगनाथ गजरे, रामेश्वर खिळे, सुदाम दळवी, सर्व विद्यार्थी व इतर कर्मचारी उपस्थित होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली त्यानंतर आम्ही भारताचे लोक सत्र पार पडले व संविधान प्रस्ताविका वाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालक रंगनाथ गजरे यांनी तर आभार गणेश पाटील यांनी मांडले.

# सहकार मंत्र्यांच्या निर्णयावरून वाद!

## झुरखेडा सरपंचांचे आमरण उपोषण मागे; शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव :** सहकार विभागातील एका निर्णयावरून राज्यात नव्याने वाद निर्माण झाला असून, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी माजी मंत्री गुलाबराव बाबूराव देवकर यांच्यावरील सुमारे १० कोटींच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाला स्थगिती दिल्याचा आरोप होत आहे. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सहकार मंत्र्यांनी आपल्या दालनात सुनावणी घेऊन या प्रकरणात स्थगिती दिल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर झुरखेडा येथील लोकनियुक्त सरपंचांनी १४ एप्रिलपासून आमरण उपोषण सुरू केले होते. अखेर प्रशासनाकडून सकारात्मक आश्वासने मिळाल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. या आंदोलनातील प्रमुख मागणी म्हणजे देवकर प्रकरणाची सखोल चौकशी करून सहकार मंत्र्यांनी दिलेली स्थगिती तात्काळ उठवावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी होती. शेतकऱ्यांच्या या मागणीला स्थानिक स्तरावर मोठा पाठिंबा मिळाला होता.

दरम्यान, जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार यांनी सरपंच पाटील यांना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे प्रत्यक्ष भेट घडवून आणण्याचे आश्वासन दिले. तसेच या प्रकरणावर सकारात्मक निर्णय घेण्याचे संकेतही त्यांनी दिल्याने आंदोलनात काहीसा दिलासा मिळाला. याशिवाय, शेतकऱ्यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना – २०१७' अंतर्गत आकारलेले व्याज तात्काळ परत करण्याची मागणी केली. भविष्यात कोणतेही व्याज आकारले जाऊ नये, तसेच नियमित पिककर्ज वाटपाबाबत ठोस निर्णय घ्यावा, अशा मागण्या देखील करण्यात आल्या. या सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाल्यानंतर संबंधित विषयावर 'विकासाचा ठराव' सादर करण्यात येणार असून, येत्या १८ एप्रिल रोजी होणाऱ्या जिल्हा बँकेच्या मासिक सभेत हा विषय आयत्यावेळी घेऊन सर्वानुमते मंजूर करण्याचे आश्वासन देण्यात आले. मागण्या मान्य झाल्याने अखेर सरपंच पाटील यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले. या निर्णयामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### उपक्रमाचे सर्व स्तरांतून जोरदार कौतुक

या प्रसंगी जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार, व्यवस्थापकीय संचालक जितेंद्र देशमुख, शेती कर्ज विभागाचे व्यवस्थापक मंगलसिंग सोनवणे, सुनील पाटील, अनिल पाटील (सचिव), सहाय्यक निबंधक विशाल ठाकूर, नरेश पाटील (सचिव), साहेबराव पाटील, मंगल पाटील, डॉ. अनिल पाटील, विजय पाटील, यशवंत चौधरी, जितेंद्र चौधरी, जुगल चौधरी, बाबुराव पाटील (वि.का. सोसा चेअरमन), गोपाल चौधरी, अरुण चौधरी, दिपक चौधरी, समाधान गायकवाड आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# संविधान जागरातून समतेचा संदेश : हृदयमानव अशोक

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त अंध शाळेत प्रभावी 'आम्ही भारताचे लोक' सत्र

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कोरेगाव येथील द पुन्हा स्कूल अँड होम फॉर ब्लाइंड बॉईज या अंध शाळेत सामाजिक समता सप्ताह आणि संविधान जागर व्याख्यानमालेअंतर्गत कवी, लेखक व दिग्दर्शक हृदयमानव अशोक यांचे "आम्ही भारताचे लोक" हे प्रेरणादायी सत्र उत्साहात पार पडले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना संविधानाच्या मूलभूत मूल्यांची जाणीव करून देत समतेचा प्रभावी संदेश देण्यात आला. या प्रसंगी बोलताना हृदयमानव अशोक यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, संविधान हे केवळ कायद्यांचे संहितापुस्तक नसून ते मानवी मूल्यांचे भक्कम सुरक्षा कवच आहे. "समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात रुजली, तरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरी आदरांजली ठरेल," असे त्यांनी ठामपणे नमूद केले. संविधान प्रस्ताविकेतील तत्त्वे केवळ पाठांतरापुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या विचारांमध्ये आणि आचरणात कशी उतरवावीत, समाजातील जबाबदाऱ्या कशा पार पाडाव्यात, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. "आम्ही भारताचे लोक" या संकल्पनेचा खरा अर्थ उलगडताना त्यांनी प्रत्येक नागरिकाची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या सोप्या, रंजक आणि प्रभावी शैलीमुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर सत्राला सुरुवात झाली आणि शेवटी संविधान प्रस्ताविकेच्या सामूहिक वाचनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रशासकीय अधिकारी अमृत लोखंडे, मुख्याध्यापक दामोदर सरगम, शिक्षक ज्ञानेश पाटील, रंगनाथ गजरे, रामेश्वर खिळे, सुदाम दळवी यांच्यासह विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंगनाथ गजरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश पाटील यांनी मांडले.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# क्विंटन डी कॉकचे शतक व्यर्थ

## प्रभसिमरन–अय्यरचा तडाखा

जन सम्राट टाईम्स



**मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) :** आयपीएल २०२६ मधील २४व्या सामन्यात पंजाब किंग्जने मुंबई इंडियन्सवर ७ गडी राखून प्रभावी विजय मिळवत स्पर्धेत दमदार कामगिरी नोंदवली. वानखेडे स्टेडियम, मुंबई येथे झालेल्या या उच्च धावसंख्येच्या सामन्यात मुंबईने २० षटकांत १९५/६ धावांची भक्कम धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरात पंजाबने १६.३ षटकांत १९८/३ धावा करत एकतर्फी विजय मिळवला. क्विंटन डी कॉकच्या शतकी खेळीवर प्रभसिमरन सिंग आणि श्रेयस अय्यर यांच्या आक्रमक फलंदाजीने पाणी फेरले. मुंबईची सुरुवात डळमळीत झाली. रायन रिकेल्टन आणि सूर्यकुमार यादव स्वस्तात बाद झाल्याने संघ अडचणीत सापडला. अशा परिस्थितीत क्विंटन डी कॉकने ६० चेंडूत ११२ धावांची अप्रतिम नाबाद खेळी साकारत डाव सावरला. चौकार–षटकारांचा भडिमार करत त्याने पंजाबच्या गोलंदाजांवर सातत्याने दबाव ठेवला. दुसऱ्या टोकाला नामन धीरने ३१ चेंडूत ५० धावांची प्रभावी साथ देत मधल्या षटकांत धावगती कायम ठेवली. शेवटच्या टप्प्यात जलद धावा जोडल्याने मुंबईने स्पर्धात्मक धावसंख्या उभारली. पंजाबकडून अर्शदीप सिंगने अचूक मार्को यान्सेनने ४ षटकांत ३० धावांत १ बळी घेत नियंत्रण ठेवले, तर शशांक सिंगने २ षटकांत १९ धावांत १ बळी घेत प्रभावी साथ दिली. १९६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाबची सुरुवात आक्रमक झाली.

### प्रभसिमरनची 80 धावांची खेळी

प्रभसिमरन सिंगने ३९ चेंडूत ८० धावांची झंझावाती खेळी साकारत सामना पूर्णपणे पंजाबच्या नियंत्रणात आणला. दुसऱ्या टोकाला कर्णधार श्रेयस अय्यरने ३५ चेंडूत ६६ धावांची भक्कम खेळी करत विजयाचा पाया अधिक मजबूत केला. प्रभसिमरन–अय्यर यांची आक्रमक भागीदारी हा सामन्याचा खरा टर्निंग पॉइंट ठरला. दोघांनी मधल्या षटकांत गोलंदाजांवर वर्चस्व गाजवत धावगती १२ च्या आसपास ठेवली.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# लातूर ग्राहक संरक्षण परिषदेतील नियुक्त्यांवर पारदर्शकतेची मागणी

## निवड प्रक्रियेत हस्तक्षेप टाळण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स




**लातूर :** लातूर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता राखावी आणि शासन निर्णयांचे काटेकोर पालन करावे, अशी मागणी लातूर जिल्हा लोक ग्राहक संरक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी तथा परिषद अध्यक्ष यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. संस्थेचे प्रतिनिधी विशाल कणसे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, ग्राहक संरक्षण परिषदेमध्ये अशासकीय सदस्यांची नियुक्ती करताना कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप होऊ नये. तसेच संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, न्याय्य आणि शासन नियमांनुसार पार पाडली जावी, जेणेकरून पात्र व्यक्तींना संधी मिळेल आणि कोणावरही अन्याय होणार नाही. पूर्वीच्या नियुक्त्यांवर प्रश्नचिन्ह निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वी झालेल्या काही नियुक्त्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार झालेल्या नसल्याचे दिसून आले आहे. विशेषतः परिशिष्ट 'ब' नुसार आवश्यक कागदपत्रांची पडताळणी न करता काही ग्राहक संघटनांच्या प्रतिनिधींना सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे यावेळी नियुक्ती प्रक्रिया अधिक काटेकोरपणे राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसारच नियुक्तीची मागणी दि. २९ ऑगस्ट २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदस्यांची निवड करण्याचे निकष व कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसारच सर्व अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची निवड करावी अशी मागणी संस्थेने केली आहे.

### नियुक्ती प्रक्रियेवर लक्ष झाले केंद्रीत

उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनाही प्रत पाठवली या निवेदनाची प्रत अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई येथील अधिकाऱ्यांसह संबंधित पदाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. तसेच लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांनाही या प्रकरणाची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, या मागणीमुळे लातूर जिल्ह्यातील ग्राहक संरक्षण परिषद नियुक्ती प्रक्रियेवर लक्ष केंद्रीत झाले असून, प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# "पुस्तकातील ज्ञानसागर म्हणजे आंबेडकर" : ॲड. नितीन घोडके

## च-होली येथे जयंतीनिमित्त व्याख्यान; विचारांची ज्वाला पेटवणारा प्रभावी कार्यक्रम

जन सम्राट टाईम्स

**पुणे (एस.एन. नांदेडकर) :** च-होली येथे तथागत वेल्फेअर फाउंडेशन व सप्तगड भीम महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी आयोजित कार्यक्रमात अँड. नितीन घोडके यांचे प्रभावी, विचारप्रवर्तक आणि विद्रोही मार्गदर्शनपर व्याख्यान मोठ्या उत्साहात संपन्न झाले. "पुस्तकातील ज्ञानसागर म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर," असे ठाम प्रतिपादन करत अँड. घोडके यांनी आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या विचारांची व्यापकता आणि कालातीत महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्धच्या लढ्याचा, हिंदू कोड बिलातील महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा तसेच आजच्या तरुण पिढीतील दिशाहीनतेचा मुद्दा थेट आणि स्पष्टपणे मांडला.



"भारतरत्न ते विश्वरत्न" हा प्रवास केवळ सन्मानाचा नसून संघर्ष, त्याग आणि विद्रोहाचा आहे, हे त्यांनी ठासून सांगितले. रमाईंच्या जीवनातील प्रसंग उलगडताना सभागृहातील महिला वर्गाच्या डोळ्यांत अश्रू तरळले, तर "सर्वकाही आंबेडकर" या घोषणांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले. त्यांच्या भाषणाने उपस्थितांना केवळ माहितीच दिली नाही, तर विचारांची ज्वाला पेटवण्याचे काम केले. या कार्यक्रमास तथागत वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष रंगनाथ वाघमारे, खजिनदार सदानंद उदागे, सचिव राजू इंगळे, सल्लागार प्रविण सोनवणे, उपाध्यक्ष राजेंद्र ढगे यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे अध्यक्ष धनराज मनोहर, खजिनदार समाधान ओव्हाळ, सचिव सचिन कांबळे उपस्थित होते. तसेच अशोक गायकवाड, राजेश आखाडे, सोमनाथ कांबळे, प्रभाकर सूर्यवंशी, जीवन कांबळे, अरविंद केदारी, चिलवंत, गोंडगे, मोरे साहेब, कुसळे साहेब, निकम साहेब, सनी गवई, वानखेडे सर, वनकर सर, रोकडे साहेब, गायकवाड सर आदींनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. यावेळी आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीचे राज्य प्रतिनिधी प्रशांत देठे, संघशिल भद्रे यांच्यासह विविध मान्यवर, कार्यकर्ते, महिला वर्ग आणि तरुण-तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, जयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांची मालिका राबवण्यात आली. ११ एप्रिल रोजी यशवंत गोसावी यांचे व्याख्यान झाले, तर १५ एप्रिल रोजी भव्य मिरवणूक काढण्यात आली. पुढे २२ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता प्रसिद्ध गायिका आई कडुबाई खरात यांचा भीमगीतांचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, ही मैफल प्रेरणादायी ठरणार आहे. या सर्व वैचारिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून जयंती उत्सवाचा समारोप करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष रंगनाथ वाघमारे यांनी दिली.

# लोकशाहीचा प्रवास उलगडणारे अभ्यासपूर्ण पुस्तक!

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** भारतीय लोकशाहीच्या अमृतमहोत्सवी प्रवासाचे सखोल आणि तटस्थ विश्लेषण मांडणारे 'भारतीय संविधान आणि लोकशाही अमृत महोत्सवी वाटचाल, एक दृष्टीक्षेप' हे प्रा. डॉ. जयसिंह सुनीता सुभाष ओहोळ लिखित पुस्तक सध्या अभ्यासक, विद्यार्थी आणि वाचकांमध्ये चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. "घागरीत सागर" अशी उपमा मिळवणारे हे पुस्तक लोकशाहीचे विविध पैलू अत्यंत नेमकेपणाने उलगडते, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. या पुस्तकात भारतीय संविधानाच्या निर्मितीपासून ते आजपर्यंतच्या




लोकशाही प्रवासातील महत्त्वाचे टप्पे सुसंगत आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले आहेत. ऐतिहासिक घटनांचा केवळ आढावा न घेता, त्यामागील सामाजिक-राजकीय संदर्भ, बदलते प्रवाह आणि त्याचे परिणाम यांचेही विश्लेषण करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, काँग्रेसच्या आणीबाणीच्या काळापासून ते सध्याच्या राजकीय आणि न्यायिक घडामोडींपर्यंतच्या विषयांना लेखकाने निर्भीडपणे स्पर्श केला आहे. लोकशाहीसमोरील आव्हाने, संकटे आणि त्यावर उपाययोजनांची स्पष्ट मांडणी हे या पुस्तकाचे वेगळेपण ठरते. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेही हे पुस्तक समृद्ध आहे. बुद्ध, प्लेटो, ॲरिस्टॉटल, जॉन ड्यूई, अब्राहम लिंकन, जॉन स्टुअर्ट मिल, पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या विचारवंतांच्या संकल्पनांचे सोप्या भाषेत विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामुळे वाचकांना लोकशाहीची संकल्पना अधिक सखोल आणि व्यापक पातळीवर समजण्यास मदत होते. लेखकाने कोणत्याही राजकीय विचारसरणीकडे झुकणारी भूमिका न घेता वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "मी प्रथम आणि अंतिमतः भारतीय आहे" या विचाराशी प्रामाणिक राहून संपूर्ण पुस्तकाची मांडणी करण्यात आली असल्याचे वाचकांचे मत आहे. आजच्या काळात लोकशाही मूल्यांपुढे अनेक आव्हाने उभी ठाकलेली असताना, तिचा ऐतिहासिक आणि वर्तमान प्रवास समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी, स्पर्धा परीक्षार्थी, अभ्यासक आणि सर्वसामान्य वाचकांसाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# माटुंगा येथे विद्यार्थिनींना करिअरच्या नव्या संधी

## शाह महाविद्यालयात भव्य प्लेसमेंट ड्राइव्ह

जन सम्राट टाईम्स

**मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) :** सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, माटुंगा येथे आयोजित करण्यात आलेला भव्य प्लेसमेंट ड्राइव्ह (रोजगार मोहीम) मोठ्या उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थिनींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचे आयोजन पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा या संकल्पनेअंतर्गत कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर यांच्या सहकार्याने करण्यात आले. महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि इतर सर्व शाखांतील द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष विद्यार्थिनींनी या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. एकूण ७७४ विद्यार्थिनींनी अर्ज केला. त्यापैकी ४०१ विद्यार्थिनी प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहिल्या. या उपक्रमात २० नामांकित कंपन्यांनी सहभाग घेत विद्यार्थिनींना विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. मुलाखतीदरम्यान विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने सहभाग घेत आपल्या कौशल्यांचे प्रभावी सादरीकरण केले. संवादकौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि व्यावसायिक दृष्टिकोन यांच्या जोरावर अनेक विद्यार्थिनींनी मुलाखतकारांवर छाप पाडली. महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलने या उपक्रमाच्या यशात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विद्यार्थिनींना पूर्वतयारी म्हणून रेझ्युमे लेखन, मुलाखत तंत्र, व्यक्तिमत्व विकास आणि संवादकौशल्य याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या तयारीमुळे विद्यार्थिनी अधिक आत्मविश्वासाने मुलाखतीला सामोऱ्या गेल्या. या संदर्भात महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी सांगितले की, "पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा या संकल्पनेअंतर्गत आयोजित प्लेसमेंट ड्राइव्हचे यशस्वी आयोजन अभिमानास्पद आहे. विद्यार्थिनींना केवळ शैक्षणिक ज्ञान देणे पुरेसे नाही. त्यांना रोजगारक्षम बनवणे आणि करिअरला दिशा देणे ही आमची जबाबदारी आहे. स्पर्धात्मक युगात कौशल्य, आत्मविश्वास आणि प्रत्यक्ष अनुभव अत्यावश्यक आहेत. हा उपक्रम त्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला आहे." या यशस्वी उपक्रमामागे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त शैलेश भगत, जिल्हा कौशल्य अधिकारी विद्या शिंगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले. प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. शुभांगी कुलकर्णी, कला शाखा प्रमुख डॉ. सरिता कासरळकर, बॅचलर ऑफ अकाउंटिंग अँड फायनान्स विभागाचे समन्वयक प्रा. दत्तात्रय गावडे तसेच सहभागी प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# 31 वर्षांच्या सेवेनंतरही न्यायापासून वंचित

## ज्येष्ठ शिक्षिकेचे शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर धरणे आंदोलन

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** पुण्यातील रास्तापेठ एज्युकेशन सोसायटीच्या आबासाहेब अत्रे इंग्लिश मिडीयम स्कूलमधील ज्येष्ठ शिक्षिका सौ. ज्योती विलास घोगरे यांनी आपल्या प्रलंबित न्याय्य मागण्यांसाठी शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन छेडले. लाल देऊळ परिसरात झालेल्या या आंदोलनाला सुभद्रा सामाजिक सेवा संस्थेचा सक्रिय पाठिंबा लाभला. सौ. घोगरे यांनी तब्बल ३१ वर्षे शाळेत प्रामाणिकपणे सेवा बजावूनही निवृत्तीनंतर त्यांना विविध आर्थिक व प्रशासकीय हक्कांपासून वंचित ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप केला आहे. सन २०२२ पासूनची २५ टक्के पगारवाढ, नियोक्ता वाटा, ग्रॅज्युएटी, सेवा पुस्तिका तसेच मुख्याध्यापक पदाचा हक्क नाकारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच एप्रिल २०१९ पासून मूळ वेतन आणि महागाई भत्यात फेरफार करण्यात आला असून, त्याची अद्याप पुनर्स्थापना करण्यात आलेली नाही, असेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. या सर्व बाबींमुळे त्यांना मोठा आर्थिक आणि मानसिक त्रास सहन



करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. निवृत्तीनंतर मिळणारी एकूण थकबाकी रक्कम सुमारे १० लाख ८७ हजार ५८१ रुपये इतकी असताना, प्रत्यक्षात केवळ १ लाख ४५ हजार ८१७ रुपये देण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी संबंधित व्यवस्थापनावर अन्याय केल्याचा ठपका ठेवला आहे. या प्रकरणी त्यांनी २०१८ पासून सातत्याने पाठपुरावा केला, मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी सांगितले. या आंदोलनात नीतीन बालकी, ईरफान सय्यद, हिरु शिंदे, विशाल अंदे, विकास भोपळे, घनश्याम फुलपगार, प्रविण फुलपगार, रत्नाकर खोब्रागडे, शोएब शेख, शहबाज शेख, अन्वर शेख, संतोष चव्हाण, रॉबर्ड फिलीप, गौतम सोनावणे, श्रीकांत बोडके यांच्यासह महिला आघाडीतील कविता जगताप, फरीदा शेख, अरुणा पाटील, मोशीम शेख, राजेंद्र जगताप, सुलेचना शिंदे आणि कलावती तुपसौंदर यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

### कर्मचारी हक्कांचा प्रश्न पुन्हाऐरणीवर

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाने तात्काळ या प्रकरणात हस्तक्षेप करून सौ. घोगरे यांना न्याय मिळवून द्यावा, तसेच प्रलंबित थकबाकी त्वरित अदा करावी, अशी मागणी केली आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रातील कर्मचारी हक्कांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, प्रशासनाची भूमिका काय राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.